# दि हायकोर्ट एम्प्लॉईज को.ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मुंबई ४०००३२.

# सभासद कल्याण निधी नियमावली

७७व्या वार्षिक सर्वसाधारण सभेने दि. १० ऑगस्ट २००७ रोजी सभासद कल्याण निधि उभारणीच्या प्रस्तावास मंजूरी दिली होती व त्या सभेतील ठरावानूसार सभासद कल्याण निधीचे प्राथमिक नियम संमत झाले होते. परंतू आता त्यात पुरेशा रकमेची भर पडलेली आहे. त्यामुळे सभासद कल्याण निधीची यापुढील उभारणी, गुंतवणूक, विनियोग, आदिसंबंधी सर्वकष नियम करणे आवश्यक झालेले आहे. यास्तव सभासद कल्याण निधीबाबत सुधारित नियमावली खालील प्रमाणे तयार करण्यात येत आहे.

**१)** या नियमास दि हायकोर्ट एम्प्लॉईज को.ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मुंबई, सभासद कल्याण निधीचे नियम असे संबोधावे.

**२) अ)** ज्या दिवशी उप—निबंधक, महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था, मुंबई, हे या नियमांना मंजूरी दिल्याचे दि हायकोर्ट एम्प्लॉईज को.ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मुंबई, या संस्थेस कळवितील त्यानंतर कार्यकारी मंडळ जी तारीख नक्की करेल त्या दिवसापासून खालील नियम अंमलात येतील.

**ब)** दि हायकोर्ट एम्प्लॉईज को.ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मुंबई, असा प्रत्येक वेळी उल्लेख न करता सोयीच्या दृष्टीने संस्था असा यापुढे उल्लेख केला जाईल.

**क)** पतसंस्थेच्या ज्या सभासदाने आपल्या सभासदत्वाचे १ वर्ष पूर्ण केलेले असेल असा सभासद, सभासद कल्याण निधीचा लाभार्थी असेल.

**ड)** सदर निधीच्या व्यवस्थापनासाठी कार्यवाहांच्या अध्यक्षतेखाली एकूण तीन व्यक्तींची सभासद कल्याण निधी समितीची नेमणूक संचालक मंडळ करेल. सभासद कल्याण निधी समितीचा कार्यकाळ संचालक मंडळाप्रमाणे राहील.

**३) निधीचा उददे्श —**

**अ)** सभासदांना आर्थिक बचत करण्याची तसेच सेवाभाव सहानुभूती व सहकाराची भावना वाढीस लागावी
म्हणून उत्तेजन देणे.

**ब)** सभासदाला त्याच्या / तिच्या अथवा सभासदाच्या कुटुंबियांच्या आजारपणात तातडीची आर्थिक मदत
मिळावी म्हणून.

**क)** सभासद निवृत्त झाल्यानंतर एक रकमी आर्थिक सहाय्य करणे..

**ड)** सभासदांच्या मुलांच्या शैक्षणिक गरजेकरिता उपलब्ध निधीचा विचार करून आर्थिक प्राप्ती करण्यास असमर्थ ठरल्यास त्याला/तिला कल्याणकारी दृष्टीकोनातून अर्थ सहाय्य करणे.

**इ)** पूर्णत: अपंगत्व येऊन आर्थिक प्राप्ती करण्यास असमर्थ ठरल्यास त्याला / तिला कल्याणकारी दृष्टीकोनातून अर्थ सहाय्य करणे.

**ऊ)** सभासदांस विकसित व प्रगत ज्ञान मिळण्यासाठी आर्थिक सहाय्य करून उत्तेजन देणे व सभासदांच्या हितासाठी, त्यांच्या आरोग्यासाठी विविध उपाययोजना करणे.

**ग)** सभासदांच्या मनोरंजनासाठी तसेच त्यांची शैक्षणिक सांस्कृतिक क्रीडात्मक व बौध्दीक पातळी उंचविण्यासाठी विविध उपक्रम राबविणे.

**ह)** सहकार चळवळीचे महत्त्व कळावे म्हणून सहकार प्रशिक्षण शिबीर आयोजित करणे.

**४) सभासद कल्याण निधीची उभारणी किंवा निर्मिती —**

**अ)** आपल्या संस्थेस दरवर्षी होणाऱ्या नफ्याची वाटणी करताना किंवा वार्षिक ताळेबंद करताना सभासद कल्याण निधीपोटी तरतूद केली जाईल.

**ब)** संस्थेच्या सभासदांना मिळणाऱ्या मासिक पगारातून **रू. ९०/—**एवढी रक्कम या निधीसाठी घेतली जाईल व यापेक्षा अधिक रक्कम घ्यावयाची असल्यास सर्वसाधारण सभेची मंजूरी घेण्यात येईल.

**क)** उपकलम (ब) नुसार ठरविलेली मासिक वर्गणी नियमितपणे देणे प्रत्येक सभासदावर बंधनकारक राहील. अशी भरलेली रक्कम कोणत्याही परिस्थितीत परत केली जाणार नाही.

**ड)** सभासद कल्याण निधीची मासिक वर्गणी जर सभासदाने सलग किंवा अधून.मधून ६महिने न भरलेली अथवा त्याच्या पगारातून कापून न आलेली आढळल्यास असा सभासद सदर निधीतून मिळणाऱ्या सवलतीस व फायदयास पात्र राहणार नाही. मात्र अशी थकीत रक्कम दंड रकमेसहित एक रकमी भरल्यास तो सर्व सवलती व फायदे मिळण्यास पात्र राहिल. जर सभासदाकडून सभासद कल्याण निधीची वर्गणी भरण्यास सतत दोन वर्षे हलगर्जीपणा होत आहे असे आढळल्यास त्याचे सभासद कल्याण निधीचे सभासदत्व आपोआप रदद् होईल.

**इ)** लाभार्थी वर्षात संबंधित सभासद थकबाकीदार असू नये.

**५) गुंतवणूक —**

महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था कायदा व त्यातील नियमाप्रमाणे सभासद कल्याण निधीची गुंतवणूक करण्यात येईल.

**६) विनियोग —**

सभासद कल्याण निधीचा विनियोग खालीलप्रमाणे करण्यात येईल.

**१)** सभासदांना तसेच त्यांच्या मुलांना शालेय, विद्यालयीन, महाविद्यालयीन तसेच पदविका परिक्षा उत्तीर्ण झाल्याबददल गुणवत्तेनुसार पारितोषिके देण्यात येतील.

**अ) शैक्षणिक गरजेकरिता आर्थिक सहाय्य :—**

सभासदांच्या पाल्यांच्या शैक्षणिक गरजेकरिता त्यांना रू.५००००/— एवढया रक्कमेचे आर्थिक सहाय्य (वर्षाला ७% शुल्क आकारून परत फेड करावयाचे आहे असे) खालील अटींची पूर्तता केल्यास प्राप्त होऊ शकेल.

१. सदर शैक्षणिक गरजेकरिता आर्थिक सहाय्य एका वर्षात फक्त प्रथम किंवा द्वितीय यापैकी कोणाही एका पाल्यास एकदाच देण्यात येईल.

२. सदर शैक्षणिक गरजेकरिता आर्थिक सहाय्य हे पाल्यांच्या इ. १०वी पुढील शिक्षणाकरिता देण्यात येईल.

३. पाल्यांची विद्यालयीन/महाविद्यालयीन फी भरली असल्यास त्याची पावती या शैक्षणिक गरजेकरिता आर्थिक सहाय्य अर्जास लावणे आवश्यक आहे किंवा विद्यालय / महाविद्यालयाकडून फी रचना (Fee Structure), माहितीपुस्तिका (Brochure) (सही व शिक्यासह) ते या शैक्षणिक गरजेकरिता आर्थिक सहाय्य अर्जास लावणे आवश्यक आहे व हे आर्थिक सहाय्य मिळाल्यानंतर सदर रक्कमेची पावती संस्थेत देणे अनिवार्य आहे.

४. सदर आर्थिक सहाय्य हे ज्या वर्षी पाल्य उत्तीर्ण होईल त्या वर्षातच विद्यालयीन/महाविद्यालयीन प्रवेशाकरीता देण्यात येईल.

५. शैक्षणिक गरजेकरिता देण्यात येणारे आर्थिक सहाय्य हे १२ महिन्यात (वर्षाला ७ % शुल्क आकारता) समान हप्त्यांमध्ये पगारातून कपात करण्यात येईल.

६. शैक्षणिक गरजेकरिता देण्यात येणारे आर्थिक सहाय्य हे जास्तीत जास्त रू. ५००००/— व कमीत कमी जेवढी विद्यालयीन/महाविद्यालयीन फी /फी रचना असेल तेवढीच देण्यात येईल. देणगी (Donation) देण्याकरीता आर्थिक सहाय्य देण्यात येणार नाही.

७. सभासद हा संस्थेतर्फे दिल्या जाणाऱ्या अन्य कोणत्याही कर्जाचा थकबाकीदार (Defaulter) नसावा.

८. शैक्षणिक गरजेकरिता देण्यात येणारे आर्थिक सहाय्य मिळाल्यापासून १ महिन्याच्या आत सभासदाने विद्यालयीन/महाविद्यालयीन फी ची पावती संस्थेस न दिल्यास ही आर्थिक सहाय्याची संपूर्ण रक्कम सभासदास कोणतीही पूर्वसुचना न देता पगारातून (संपूर्ण ७% शुल्कासहित) कापून घेण्यात येईल.

९. शैक्षणिक गरजेकरिता देण्यात येणाऱ्या आर्थिक सहाय्याकरिता केलेल्या अर्जात सभासदाने सर्व अटी व शर्ती त्याच्यावर बंधनकारक आहे असे वचन लिहून दिले पाहिजे.

१०.सभासद कल्याण निधीतील रक्कमेच्या उपलब्धतेनूसार सदर आर्थिक सहाय्य देण्यात येईल. या आर्थिक सहाय्यांकरीता सभासदांकडून जे शुल्क आकारले जाईल ते त्या त्या वर्षाकरीता कमी/जास्त करण्याचा अधिकार संस्थेच्या संचालक मंडळाकडे राहील.

**ब) शैक्षणिक गरजेकरीता (कॉम्प्यूटर/लॅपटॉप/टॅब/मोबाईल) इ. साहित्याकरीता आर्थिक सहाय्य :—**

सभासद किंवा त्यांच्या पाल्यांना वरील शैक्षणिक साहित्याकरीता जास्तीत जास्त रू. ७५०००/— पर्यंत आर्थिक सहाय्य (वर्षाला ७% शुल्क आकारून परतफेड करावयाचे आहे असे.) खालील अटींची पूर्तता केल्यास प्राप्त होऊ शकेल.

१) सदर शैक्षणिक साहित्याकरीता आर्थिक सहाय्य सभासदास ५ वर्षातून एकदाच मिळेल.

२) हे साहित्य घेताना त्याचे कोटेशन संस्थेस देणे आवश्यक आहे. जास्तीत जास्त रू. ७५०००/—पर्यंत हे आर्थिक सहाय्य सभासदास धनादेशद्वारे देण्यात येईल.

३) सभासदाने हे साहित्य घेतल्यावर त्याची रीसिप्ट/पक्के बील संस्थेस सादर करणे आवश्यक आहे.

४) या शैक्षणिक साहित्याकरीता देण्यात येणारे आर्थिक सहाय्य हे १२ महिन्यात (वर्षाला ७% शुल्क आकारता) समान हप्त्यांमध्ये पगारातून कपात करण्यात येईल. **म्हणजेच रू. ७५०००/— साठी दरमहा रू. ६६८८/— (आर्थिक शुल्क पकडून) असे १२ हप्ते.**

५) शैक्षणिक साहित्याकरीता देण्यात येणारे आर्थिक सहाय्य हे जास्तीत जास्त रू. ७५०००/— व कमीत कमी जेवढे कोटेशन असेल तेवढेच देण्यात येईल.

६) शैक्षणिक साहित्याचे अर्थिक सहाय्य मिळाल्यापासून १ महिन्याच्या आत सभासदाने त्याचे बील किंवा पावती संस्थेस न दिल्यास ही अर्थिक सहाय्याची संपर्ण रक्कम सभासदास कोणतीही पूर्वसूचना न देता पगारातून आर्थिक शुल्कासहित कापून घेण्यात येईल.

७) शैक्षणिक साहित्याचे अर्थ सहाय्य सभासदाच्या पगारातून 1/3 रक्कम त्याच्या हातात येते की नाही ते पाहूनच देण्यात येईल.

८) सभासद हा संस्थेतर्फे दिल्या जाणाऱ्या अन्य कोणत्याही कर्जाचा थकबाकीदार Defaulter नसावा.

९) या आर्थिक सहाय्याकरीता केलेल्या अर्जात सभासदाने एका सभासदाचे हमीपत्र देणे आवश्यक आहे त्याचप्रमाणे त्याने सर्व अटी व शर्ती त्याच्यावर बंधनकारक आहे असे वचन लिहून दिले पाहिजे.

१०) हे आर्थिक सहाय्य मिळालेला सभासद कोणत्याही कारणास्तव ही रक्कम परतफेड करू शकला नाही तर त्याच्या रकमेकरीता हमीपत्र लिहून देणाऱ्या सभासदाकडून ही संपूर्ण रक्कम आर्थिक शुल्कासह पगारातून वसूल करण्यात येईल.

११) सभासद कल्याण निधीतील रक्कमेच्या उपलब्धतेनूसार सदर आर्थिक सहाय्य देण्यात येईल. या आर्थिक सहाय्याकरीता सभासदांकडून जे आर्थिक शुल्क आकारले जाईल ते त्या त्या वर्षाकरीता/ कमी जास्त करण्याचा अधिकार संस्थंच्या संचालक मंडळाकडे राहिल.

---

**२)** सभासदांच्या हितासाठी, त्यांच्या आरोग्याकरिता विविध उपाययोजना करण्यासाठी/विविध उपक्रम राबविण्यासाठी या निधीतून खर्च करता येईल.

**३)** सभासद, त्याची पत्नी, तिचे पती, त्यांच्यावर संपूर्णतः अवलंबून असणारी मुले आणि सभासदांबरोबर राहत असलेले आणि त्यांच्यावर संपूर्णतः अवलंबून असलेले त्याचे/तिचे आई—वडिल—बहिण आजारी पडल्यास त्यांच्या आजारपणाच्या उपचारासाठी सभासदास रूपये १००००/— किंवा आजारपणावर प्रत्यक्ष झालेला खर्च यापैकी जी कमी असेल ती रक्कम ना परतावा वैद्यकीय मदत म्हणून दिली जाईल. अशी मदत सभासदास खालील अटी व शर्तीचे अधीन राहून व सभासदाने त्याचे पालन केल्यावरच मिळू शकेल.

**अ)** सभासदाने वैद्यकीय मदत मिळण्यासाठी संस्थेस लेखी अर्ज सादर केला पाहिजे.

**ब)** सभासद किंवा सभासदाच्या कुटुंबातील वैद्यकीय मदत मिळण्यास पात्र अशा व्यक्तीचे रूग्णालयात सलग ४८ तास वास्तव्य झालेले असले पाहिजे. अशा व्यक्तीस रूग्णालयातून घरी सोडल्यास रूग्णालयाचा त्याबाबतचा दाखला (डिस्चार्ज कार्ड), रूग्णालयाचे बिल व रिसिप्ट, डॉक्टरांच्या औषधपत्रांसह औषधांची बिले रूग्णास डिस्चार्ज दिल्यापासून १ महिन्याचे आत सभासदाने लेखी अर्जासह संस्थेस सादर केले पाहिजेत/ **सभासद स्वतः आजारी असल्यास व डिस्चार्ज मिळाल्यापासून कार्यालयात हजर राहू न शकल्यास, ज्या दिवशी तो कार्यालयात हजर राहील त्यादिवसापासून आठ दिवसांचे आत सभासदाने लेखी अर्जासह वर नमुद केल्याप्रमाणे वैद्यकीय कागदपत्रे, तंदुरूस्त प्रमाणपत्र (Fitness Certificate) संस्थेत सादर केले पाहिजेत.** उशिरा आलेल्या अर्जाचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही. अशी कागदपत्रे सादर केल्यानंतर त्याची तपासणी करून केलेल्या मागणीच्या खरेपणाबदद्ल सभासद कल्याण निधी समितीला खात्री झाल्यानंतरच वैद्यकीय मदतीची रक्कम दिली जाईल. सभासद कल्याण निधी समितीला आवश्यक अशी अधिक कागदपत्रे मागण्याचा अधिकार राहिल. समाधानकारक कागदपत्रे नसल्यास मदत दिली जाणार नाही. सभासद रूग्णालयात असता त्याचे/तिचे अकाली निधन झाल्यास त्याची/तिची नामनिर्देशित व्यक्ती याबाबतच्या अटीस अधिन राहून वैद्यकिय मदत मिळण्यास पात्र असेल.

**क)** सभासदास त्याच्या कुटुंबातील वैद्यकिय मदतीस पात्र अशा व्यक्तीस वैद्यकिय उपचारासाठी मदत हवी असल्यास त्याबाबतचा अर्ज सभासदाने स्वतःच्या सहीने संस्थेकडे सादर केला पाहिजे. अशा अर्जात सदर व्यक्ती, (पती/पत्नी सोडून) सभासदावर पूर्णपणे अवलंबून आहे अशा विधानाचा स्पष्ट उल्लेख असला पाहिजे. असा उल्लेख नसल्यास अशा व्यक्तीच्या उपचाराकरीता मदत दिली जाणार नाही. असे केलेले विधान खोटे आहे असे आढळल्यास दिलेल्या वैद्यकिय मदतीची रक्कम सभासदास पुर्वसुचना देऊन त्याच्या पगारातून पाच समान हप्त्यात वसूल केली जाईल. अशी रक्कम कापून घेण्यास सभासदाची मंजूरी आहे असे गृहित धरले जाईल.

**ड)** वैद्यकिय मदतीसाठी केलेल्या अर्जात सभासदाने वैद्यकिय मदतीबदद्लच्या अटी व शर्ती त्याच्यावर बंधनकारक आहेत असे वचन लिहून दिले पाहिजे.

**इ)** प्रसूतिसाठी वैद्यकिय मदत दिली जाणार नाही. मात्र अशी प्रसूति सिझेरियन शस्त्रक्रियेने झाली असेल आणि डिस्चार्ज कार्डात तसा स्पष्ट उल्लेख असेल तरच वैद्यकिय मदत दिली जाईल.

**ई)** सभासद किंवा त्याच्या/तिच्या (३) मध्ये उल्लेखिलेल्या त्याच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीस नियम ६(३) अन्वये मदत दिली गेली असेल त्या दिवसापासून पाच वर्षे पुर्ण होईपर्यंत सभासद किंवा ६(३)मध्ये उल्लेखिलेली सभासदाच्या कुटुंबातील कोणतीही व्यक्ती अशी मदत मिळण्यास पात्र राहणार नाही.

**फ) गंभीर आजाराकरिता/आकस्मिक आजाराकरिता वैद्यकीय मदत :—**

**सभासदाने खालीलपैकी एखादया गंभीर आजारावर/आकस्मिक आजारावर शस्त्रक्रीया किंवा उपचार करून घेतले असल्यास उपरोक्त संस्थेकडून त्या सभासदास सभासद कल्याण निधी योजने अंतर्गत गंभीर आजाराकरिता रू. ३००००/— व आकस्मिक आजाराच्या उपचाराकरिता रू. १५०००/— ची नापरतावा वैद्यकीय मदत खालील अटींची पूर्तता केल्यास प्राप्त होऊ शकते.**

१. सभासदाला त्याच्या सभासद कालावधीत या मदतीचा लाभ फक्त एकदाच घेता येईल.

२. सदर मदतीसाठी सभासद हा स्वत:, खालीलपैकी कोणत्याही एका गंभीर आजाराने किंवा आकस्मिक आजाराने पिडीत असेल तर....

*<u>गंभीर आजार</u> :—

१. हृदय शस्त्रक्रीयांची प्रकरणे **(Heart Surgery)**

२. हृदय उपमार्ग शस्त्रक्रीया **(Bye Pass Surgery)**

३. ॲन्जिओप्लॅस्टी शस्त्रक्रीया

४. मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रीया **(Kidney Tranaplantation)**

**5- कर्करोग (Cancer)**

*<u>आकस्मिक आजार</u> :—

१. **Covid-19** (**Pandamic** कालावधीकरिता)

३. सभासदाला गंभीर आजाराच्या शस्त्रक्रीयेसाठी / उपचारासाठी रू. ३००००/— किंवा प्रत्यक्ष झालेला खर्च यापैकी जी कमी रक्कम असेल ती त्याचप्रमाणे सभासदाला आकस्मिक आजाराच्या उपचारासाठी रू. १५०००/— किंवा प्रत्यक्ष झालेला खर्च यापैकी जी कमी रक्कम असेल ती नापरतावा वैद्यकीय मदत म्हणून दिली जाईल.

४. सभासदांनी अशा आजारांवर शस्त्रक्रीया / उपचार करून घेतले असल्यास डॉक्टरांचे प्रमाणपत्र (दाखला) देणे आवश्यक आहे किंवा सभासदास गंभीर आजाराकरिता/आकस्मिक आजाराकरिता मदत देताना सभासद जर हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असेल व त्यावेळी त्याला उपचाराकरिता गंभीर आजाराकरिता रू.३००००/—व आकस्मिक आजाराकरिता रू.१५०००/— पर्यंत खर्चाची आवश्यकता असेल तर अशा वेळी त्याला ती रक्कम अर्ज केल्यानंतर ज्या हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असेल त्या हॉस्पिटलमधील डॉक्टरांच्या प्रमाणपत्रासह (उपचाराकरिता लागणाऱ्या खर्चाच्या तपशीलासह) त्वरीत देण्यात यावी व डिस्वार्ज मिळाल्यानंतर त्यांनी संस्थेत १ महिन्याचे आत डिस्चार्ज कार्ड/शस्त्रक्रिया उपचारासाठी झालेल्या वैद्यकीय खर्चाची बीले जोडणे आवश्यक असेल. ही कागदपत्रे जर सभासदाने १ महिन्याचे आत संस्थेत सादर न केल्यास किंवा ती कागदपत्रे बोगस, फसवी आढळल्यास देण्यास आलेली वैद्यकीय मदत त्या सभासदांकडून पाच समान हप्त्यात वसुल करण्यात येईल.

५. सदर मदतीसाठी सभासदांनी त्याच्यासाठी अथवा कुटूंबासाठी यापूर्वी रू. ५०००/—किंवा रू. १००००/— एवढया रक्कमेच्या वैद्यकीय मदतीचा लाभ घेतला असेल तरीसुध्दा अशा सभासदास गंभीर आजारासाठी/आकस्मिक आजाराकरिता फक्त एकदाच स्वत: करीता पुन्हा लाभ घेता येईल.

६. सभासदांनी सदर आजारांवर शस्त्रक्रीया / उपचार केल्यापासून एक महिन्याच्या आत संस्थेत लेखी अर्जासोबत खालील कागदपत्रे सादर करावी.

**अ) डिस्चार्ज कार्ड ब) डॉक्टरांचे प्रमाणपत्र क) शस्त्रक्रीयेसाठी / उपचारासाठी झालेल्या वैद्यकीय खर्चांची बिले.**

**४)** ज्या सभासदाने आपल्या सलग/नियमित सभासदत्वाची पुढील विहित वर्ष पुर्ण केली असतील असा सभासद नियत वयोमानानुसार अथवा स्वेच्छानिवृत्त झाल्यास त्यास सभासद कल्याण निधीतून पुढीलप्रमाणे—
रेखांकित धनादेशाद्वारे देण्यात येतील.

**१)** सभासदत्वाची — १० वर्षे पूर्ण — रू. ५०००/—
**२)** सभासदत्वाची — १५ वर्षे पूर्ण — रू. ७५००/—
**३)** सभासदत्वाची — २० वर्षे पूर्ण — रू. १००००/—
**४)** सभासदत्वाची — ३० वर्षे पूर्ण — रू. १५०००/—

**५)** सभासदांच्या मनोरंजनासाठी तसेच त्यांची शैक्षणिक, सांस्कृतिक व बौध्दिक पातळी उंचावण्याचा दृष्टीने ग्रंथसंग्रहालय स्थापन करणे तसेच सहली, व्याख्याने, कथाकथने, कवी संमेलने, प्रवचने आणि तत्सम कार्यक्रम आयोजित करण्यात येऊन त्यावरील खर्च सभासद कल्याण निधितून भागविला जाईल.

**६)** सभासद कल्याण निधी समितीकडून शिफारस/प्रस्ताव प्राप्त झाल्यावर उपलब्ध निधीचा व उद्द्देशांचा विचार करून योजनेनुसार दयावयाच्या आर्थिक भरतीमध्ये वाढ किंवा कमी करणे याबाबतचे अधिकार संचालक मंडळास असतील.

**७)** सभासद कल्याण निधी समितीकडून शिफारस/प्रस्ताव प्राप्त झाल्यावर ज्या उदिद्ष्टांसाठी सभासद कल्याण निधीतून खर्च करावयाचा असेल अशा कोणत्याही उदिद्ष्टांसाठी तातडीने खर्च करावयाचा झाल्यास तसा खर्च करण्याचे अधिकार अध्यक्ष आणि सचिव किंवा खजिनदार यास राहतील. मात्र असा खर्च केल्यापासून एक महिन्याच्या आत कार्यकारी मंडळाची या खर्चास संमंती घेणे बंधनकारक राहिल.

**८)** या व्यतिरिक्त सभासदांच्या हिताकरीता जर एखादा खर्च या निधीमधून करावयाचा असेल तर कार्यकारी मंडळास त्यांच्या अधिकारात सदरचा खर्च करण्याचा अधिकार राहील.

**९)**सभासद कल्याण निधी समितीकडून शिफारस/प्रस्ताव प्राप्त झाल्यावर या निधीसाठी जर काही रक्कम कमी पडत असेल तर संचालक मंडळाला जास्तीची रक्कम आकस्मिक निधीमधून खर्च करण्याचा अधिकार राहील.